ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!



## गोष्ट क्र. ४६

अनुराधा दामले
(इ. १०वी १९८४)

दि. १२ डिसेंबर २०२१

माझा कामाचा approach हा execution-oriented आहे. त्यामुळेच, कुठल्याही नवीन कामाची सुरुवात करताना मी स्वतःच एक Risk Analysis/mapping करते, आणि मला नवीन कामाचा आवाका आणि येऊ घातलेल्या अडचणींची काहीशी पूर्वकल्पना येते. चालून आलेल्या संधी नीट तपासून पाहणे, पुढे काय करता येईल याचा विचार करत राहिल्याने काम अधिक चांगले होते, असं मला वाटतं. मी स्वतःला कुठल्या एकाच प्रकारच्या कार्यपद्धतीशी बांधून ठेवलं नाही. सतत अभ्यास करून, सतर्क राहून, वेगवेगळ्या वाटा शोधणे आणि त्यानुसार काम करणे हा माझा स्वभाव आहे. मला कायम अद्ययावत असावे असे वाटते आणि त्याप्रमाणे नवनवीन गोष्टी शिकून मी ते साध्य करण्याचा प्रयत्न करते. Kaizen - Continuous Improvement अंगीकारल्याने तुमची विचारशैली / कार्यशैली / क्षमता या सगळ्या रुंदावल्या जाऊ शकतात, असा माझा विश्वास आहे.

### प्रबोधिनी आणि मी



प्रबोधिनीमधल्या मैत्रिणी

प्रबोधिनीची प्रवेश चाचणी मी एकदा नाही, तर दोनदा दिली. तेव्हा आम्ही पुण्यापासून लांब राहत होतो, आणि येण्याजाण्याची सोय नीट झाली नव्हती. त्यामुळे पाचवीसाठी प्रवेश मिळून देखील मी आले नाही. दोन वर्षांनंतर पुण्यात राहायची सोय झाली, घर घेतलं आणि सातवीमध्ये पुन्हा एकदा प्रवेश परीक्षा देऊन मी प्रबोधिनीत आले. माझ्या शिक्षणाच्या बाबतीत निर्णय घेताना माझ्या आईसाठी बाहेरच्या स्पर्धात्मक वातावरणात बहुआयामी गुणात्मक शिक्षण या गोष्टी महत्त्वाच्या होत्या, आणि त्यासाठीच प्रबोधिनी तिला योग्य वाटली. सातवी ते दहावी ही चार वर्षं माझ्यासाठी अतिशय संस्मरणीय आहेत. सर्व शिक्षकांचा – नीलिमाताई, शैलजाताई, सुप्रियाताई, हेमाताई, विशेषतः नलूताई यांचा खूप मोठा प्रभाव माझ्यावर आहे. प्रबोधिनीमध्ये असताना मी दलाव्यतिरिक्त इतर उपक्रमांमध्ये फारसा सहभाग घेतला नाही. सुरुवातीला स्फूर्ती दल – नारायण पेठेत कॉर्पोरेशनच्या १९ नंबरच्या शाळेत व्हायचे. नववी-दहावीच्या सुमारास लोकमान्य नगर जवळच्या दलावर मी जात होते. इथे सातवीत आले असल्याने आधीच्या शाळेतले आणि प्रबोधिनीमधले फरक मला अधिक प्रकर्षाने जाणवले. सातवीपर्यंत पिंपरीमधील शिक्षणतज्ज्ञ कै. शकुंतला ढवळीकर यांच्या H. A. प्रायमरी स्कूलमध्ये माझं शिक्षण झालं. तिथली शिस्त वाखाणण्याजोगी होती. वक्तशीरपणा हे तिथलं तत्त्व प्रबोधिनीमध्ये देखील असल्याने ते माझ्या मनावर ठसलं. प्रबोधिनीमधील शिक्षणशैली अधिक मुक्त वाटली. पुस्तकी ज्ञानाच्या पलीकडे संवाद साधून, स्व-अध्ययनाचे धडे देणारी प्रशाला माझ्यासाठी वेगळी होती. वाचनाचा तास, प्रतिभाविकसनाचा तास, प्रकल्प या संकल्पना वेगळ्या होत्या. अभ्यासाची तंत्रे – वाचनवेग, Survey-Question-Read-Recite-Review(SQ3R) या सगळ्याचा पुढे खूप उपयोग झाला.



नीलिमाताई करमरकर

त्यावेळी शिक्षणासंबंधी चालू असलेले बरेच प्रयोग आमच्यावर कळत-नकळत झाले. प्रत्येक कामाचं तंत्र समजून घेऊन, ते आत्मसात करून त्याप्रमाणे काम करायला प्रबोधिनीने शिकवलं. आठवीत असताना नलूताईंनी जाहीर केलं, की तोंडी परीक्षा आता एका वेगळ्या पद्धतीने घेण्यात येईल. तुम्हाला एक विषय देण्यात येईल, त्या विषयावर पूरक वाचनासाठी पुस्तकं सांगितली जातील, आणि नंतर तुम्ही त्या विषयाचं सादरीकरण करायचं. हे सादरीकरण आणि त्याविषयीची तंत्र खूप अवघड वाटली. इथे वक्तृत्व स्पर्धेचा अनुभव थोडाफार कामी आला, परंतु स्वाध्याय, आकलन, सादरीकरण या वेगळ्या गोष्टी शिकायला मिळाल्या. परीक्षेच्या आदल्या दिवशी धावाधाव करून पुस्तकं आणणे, अभ्यास करणे, नलूताईंसमोर बोलण्याचं दडपण, पण त्यांनी दिलेल्या शाबासकीमुळे वाटलेलं समाधान या आणि अशा अनेक गोष्टी आज आठवतात. नववी-दहावीला आमच्याकडे सर्वांनीच विशेष लक्ष दिलं. दहावीनंतर प्रबोधिनीशी संपर्क तसा कमी झाला, परंतु आम्ही इथल्या मैत्रिणी आजदेखील एकमेकींच्या संपर्कात आहोत. प्रबोधिनीने दिलेल्या इतर शिदोरीसोबत इथली मैत्री माझ्यासाठी अमूल्य आहे.



शैलजाताई देशमुख

### वेगळी वाट

मला गणिताची आवड होती. अभियांत्रिकीमध्ये देखील रस होता. प्रबोधिनीच्या कलचाचणीमध्ये बेसिक सायन्स, इंजीनिअरिंग या शाखेसाठी अनुकूलता दिसली. यामुळे, कल तसंच आवड बघता माझं पदवीचं शिक्षण अभियांत्रिकी शाखेत झालं. B.E. Mechanical ची पदवी संपादन केली. शिकत असताना खरं तर industry मध्ये जाईन असा विचार केला नव्हता. सुरुवातीला उच्च शिक्षण घेऊन, परदेशात MS अथवा तत्सम पदवी मिळवून शिक्षकी पेशात येण्याचा माझा मानस होता. तिसऱ्या वर्षाच्या सुमारास हळूहळू लक्षात आलं, की परदेशात पदव्युत्तर शिक्षण ही खर्चिक बाब आहे. त्यामुळे, आधी पैसे जमवण्यासाठी मी नोकरी सुरू केली. सुरुवातीला काम जमेल का नाही याबाबत जरा साशंक होते, परंतु त्या नंतर काम जमूही लागलं आणि आवडूही लागलं. माझं काम Machine Tool Industry मध्ये होतं, ज्यामध्ये जपान मधून आणलेल्या पार्टसचा

समावेश होता. त्यांची गुणवत्ता अनुभवल्यावर त्या देशाबद्दल मला कुतूहल निर्माण झालं. त्यामुळे तिथे काम करायचं असं मनाशी पक्कं केलं. रोजचं ऑफिसचं काम संपल्यावर संध्याकाळी जपानी भाषेचे धडे गिरवायला सुरुवात केली. नव्वदच्या दशकात software boom ची सुरुवात होती, and it felt like the next big thing. बदलतं तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी माझ्या क्षेत्राशी त्याचा थेट संबंध नसताना कॉम्पुटरचा कोर्स देखील करायला सुरुवात केली. जपानी भाषा शिकल्याने काही काळ मी विविध प्रकल्पांसाठी दुभाषी म्हणून काम केलं. त्यातीलच एक उदाहरण म्हणजे BPL Sanyo च्या प्लान्टवर factory setup साठी दुभाष्याचं काम करणं. त्याच क्षेत्रात पुढे काम करायची संधी आली होती आणि त्याच वेळेला कॉप्युटरचा कोर्स केला असल्याने सॉफ्टवेअर मधील कामाची देखील संधी आली होती. विविध लोकांशी चर्चा करून माहिती घेतल्यावर असं कळलं, की सॉफ्टवेअरच्या कामामध्ये चांगला वाव आहे, म्हणून या क्षेत्राकडे वळले.

**जपानची कहाणी**

कामानिमित्त बऱ्याच जपान वाऱ्या झाल्या, आणि नंतर ५-६ वर्षं तिथे राहिलेदेखील. १९९५ च्या सुमारास मी IT क्षेत्रात आले आणि लगेचच जपानला जायची पहिली संधी मिळाली. एक वेगळं क्षेत्र, संस्कृती जवळून अनुभवता आली. जपानी संस्कृती - हायकू, इकेबाना, सुशी अथवा इतर सौंदर्यपूर्ण गोष्टींसाठी कायम चर्चेत राहिली आहे, ज्यामुळे त्या देशाची एक सुंदर अलवार प्रतिमा आपल्या मनात असते. या पार्श्वभूमीवर त्यांचं औद्योगिक वातावरण हे काहीसं विरोधाभासी आहे. IT industry वर देखील त्याकाळी manufacturing चा पगडा होता. माझ्या अनुभवानुसार, साधारण १९९५-२००० पर्यंत काहीसं पारंपरिक, परदेशी लोकांशी अंतर ठेवून असणारं, असं काहीसं वातावरण होतं. त्यानंतर २०१० पर्यंत नव्या चालीरिती आल्या, भारतीयांबाबत त्यांचं धोरण थोडं नरमाईचं झालं, भारतीय लोकांबद्दलची स्वीकृती वाढीस लागली. २०१० नंतर धोरण अजूनच मुक्त झालं, अधिक मोकळं आणि जागतिक पातळीवर पोचणारं. गेल्या काही वर्षांमध्ये तर जपानमध्ये जाणाऱ्या भारतीयांच्या संख्येमध्ये देखील वाढ झाली आहे.

जपानने मला भले-बुरे बरेच अनुभव दिले. तिथे शिफ्ट झाल्यावर एका छोट्या कंपनीपासून कामाला सुरुवात केली. एरवी मोठ्या कंपनीत काम करताना PC assemble करावा लागत नसे. इथे मात्र कंपनी छोटी असल्याने PC assembly साठी तिथल्या इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेमधून components आणणे, कॉम्पुटर जोडणे इथपासून कामाला सुरुवात केली. जपानी लोकांचा व्यावसायिक दृष्टिकोन, ग्राहकांबद्दलच्या कल्पना, व्यावसायिक नैतिकता याचा इत्यंभूत परिचय झाला. खूप काही शिकायला मिळालं, एक वेगळी विचारसरणी दिसली. जपानी लोकांकडची तेव्हाची मी पाहिलेली पद्धत अशी, की तुम्ही शिकत असताना एखाद्या वेगळ्या क्षेत्राचा अभ्यास करत असलात, तरी दुसऱ्या क्षेत्रात काम करू शकता. माझ्या कंपनीमध्ये इंटर्नशिपसाठी अगदी १०वी नंतर लगेच आलेली मुलं-मुली, तसंच आर्टस्‌मध्ये शिक्षण घेत असलेले विद्यार्थी देखील काम करत होते.









कामातील सहकारी

**जपानी वक्तृत्व स्पर्धा प्रशस्तिपत्रक**



新しい自分発見の旅 賞

ダムレ アヌラダ 様

あなたは 大田区主催
「日本語でスピーチ」にお
いて 頭書のとおりすば
らしい発表をされました
ので これを賞します

2002年10月6日

大田区長 西野 善雄

मी तोक्योमध्ये freelancer/contract basis वर काम करत असल्याने बऱ्याच विविध प्रकल्पांवर काम करता आलं. अशा एका प्रकल्पाचा भाग म्हणून, जपानची संपूर्ण पेन्शन प्रणाली नव्याने तयार करणाऱ्या कोअर टीमची मी एक सदस्य होते. तेव्हा त्यांची negotiations ची तंत्रं, छोट्यातल्या छोट्या गोष्टींवर भर देणे या आणि अशासारख्या बऱ्याच बाबी अनुभवल्या. ग्राहकसेवा या विषयाचा वस्तुपाठ तिथे मिळाला. एकूणच त्या काळी, जवळपास सर्वच जपानी कंपन्यांमधून परदेशी लोकांना त्यांच्या कोअर टीममध्ये संपूर्णतः समाविष्ट करून घेण्याबद्दल फारच कमी पुढाकार घेतला जात असे. असे असून देखील, त्या गटात मी एकटीच परदेशी होते, तेवढा विश्वास स्वतःबद्दल निर्माण करण्यात मी यशस्वी झाले होते. जपानी प्रोजेक्ट म्हणलं, की stringent quality requirements या येतातच. अतिशय काटेकोर कार्यपद्धती, zero bugs approach, proper and timely documentation या आणि इतर अशा कितीतरी गोष्टी शिकता आल्या.

जपानमधल्या वास्तव्यात तेथील सामाजिक रचनेशी जवळून ओळख झाली. सामाजिक भान आणि सुरक्षितता तिथल्या नागरिकांच्या कणाकणात भिनल्या आहेत. Exemplary public transport network, user-oriented approach to every aspect of life - living standards, space management, infrastructure, inclusion, salesmanship हे सगळे त्या देशाचे गुण मी अनुभवले आहेत.

**सेतुबंधन**

माझ्या आईवडिलांची तब्येत काहीशी ठीक नव्हती म्हणून साधारण २००५ साली भारतात परतण्याचा निर्णय घेतला. इथे आल्यावर मी Softbridge Solutions या कंपनी बरोबर कामाची सुरुवात केली. या कामाची पार्श्वभूमी अशी – २००५-२०१० च्या सुमारास जपानी कंपन्या मुख्यतः चिनी कंपन्यांना Offshore कामे देत असत. भारताकडे offshore option म्हणून बघायला सुरुवात झाली होती, आणि जपानी लोकांना भारतीय offshoring कसे करायचे या प्रशिक्षणाची आवश्यकता होती. CDAC बरोबर आम्ही हे प्रशिक्षण सुरू केले होते. या अंतर्गत management of Indian Projects - Getting to know the work culture, learning English, customized technology courses यांचा समावेश होता. या प्रशिक्षणानंतर प्रकल्पासाठी collaborate करणं सुकर होत असे.

माझ्या कामामधला बदल असा, की यापूर्वी मी तांत्रिक बाबींचं काम यावर भर देत होते. या निमित्ताने माझा प्रवेश management aspect मध्ये झाला. यानंतर मी एका जपानी आंतरराष्ट्रीय कंपनीसाठी portfolio ownership चं काम करायला सुरुवात केली. त्याकाळी अगदी अग्रगण्य आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्येदेखील जपानी प्रकल्प कमी होते. कुठल्याही जपानी कंपनीशी करार करून त्यांच्या निकषांवर तंतोतंत उतरणे म्हणजे एक कसरत आहे. भाषेची अडचण आणि difficulty in implementation of complex project development processes ही यासाठीची प्रमुख कारणे आहेत. भारतीय कामाच्या वातावरणामध्ये जपानी project development processes स्वीकारून माझ्या टीमने एक framework तयार केलं. This was very effective in terms of efficiency, productivity and cost for both Japanese as well as Indian companies.

दक्षिण आशियाई देश (म्यानमार, व्हिएतनाम इत्यादी), भारत आणि जपान या टीमचा एक मोठा R& D प्रोजेक्ट देखील माझ्या टीमने केला, ज्या अंतर्गत या देशांमधील कार्यपद्धतीचा तपशीलवार तुलनात्मक अभ्यास केला. प्रत्येक देशाच्या टीमच्या क्षमता अभ्यासून आंतरराष्ट्रीय टीम तयार केल्या. याच सुमारास कंपनीचे म्यानमारमधील सेंटर संपूर्ण उभारून दिले. यांगोन (म्यानमार), पुणे (भारत) आणि तोक्यो (जपान) इथून coordinate करून म्यानमारमधील teams select करणे, त्यांचं प्रशिक्षण आणि प्रकल्प सुरू करून देणे, आणि इतर related management activities यात माझा सहभाग होता.



म्यानमार आणि भारतीय टीम




दुभाषी म्हणून काम करताना

**नव्याने उघडलेली दारं**




या सर्व कामाच्या निमित्ताने माझा अनेक विविध विषयांशी परिचय झाला. Project Finance (cost-optimization, budgeting etc), project portfolio management यासाठी पूरक CFA सारख्या परीक्षा दिल्या. सुरुवातीला विषय समजून घेणं आणि परीक्षेसाठी लेखन करणं, हे थोडं अवघड गेलं, पण हळूहळू जमलं. सध्याच्या कामाव्यतिरिक्त इतर कुठल्याही क्षेत्रातील जपानी कंपन्यांसोबतची dealings/negotiations करण्याचं काम मी करते.

माझा कामाचा approach हा execution-oriented आहे. त्यामुळेच, कुठल्याही नवीन कामाची सुरुवात करताना मी स्वतःच एक Risk Analysis/mapping करते, आणि मला नवीन कामाचा आवाका आणि येऊ घातलेल्या अडचणींची काहीशी पूर्वकल्पना येते. चालून आलेल्या संधी नीट तपासून पाहणे, पुढे काय करता येईल याचा विचार करत राहिल्याने काम अधिक चांगले होते, असं मला वाटतं. मी स्वतःला कुठल्या एकाच प्रकारच्या कार्यपद्धतीशी बांधून ठेवलं नाही. सतत अभ्यास करून, सतर्क राहून, वेगवेगळ्या वाटा शोधणे आणि त्यानुसार काम करणे हा माझा स्वभाव आहे. मला कायम अद्ययावत असावे असे वाटते आणि त्याप्रमाणे नवनवीन गोष्टी शिकून मी ते साध्य करण्याचा प्रयत्न करते. Kaizen - Continuous Improvement अंगीकारल्याने तुमची विचारशैली / कार्यशैली / क्षमता या सगळ्या रुंदावल्या जाऊ शकतात, असा माझा विश्वास आहे.

**थोडं मागचं, थोडं पुढचं**

लहानपणापासून निसर्गाची ओढ होती. पण, एखाद-दोनदा सिंहगड सोडल्यास आधी फारशी फिरले नव्हते. तेव्हा ट्रेकिंग करू शकेन असा आत्मविश्वास नव्हता, परंतु इच्छा होती. I am very much interested in all the majestic wonders of nature. जपानमध्ये असताना, फुजी ज्वालामुखीचे विवर बघण्याची जबरदस्त इच्छा होती. म्हणून एका चिनी आणि एका जपानी सहकाऱ्याबरोबर तिथे गेले. पहिल्यांदाच ऑक्सीजन कमी असलेल्या वातावरणाचा अनुभव तिथे आला. तिथे विवरात एक जळका वास सतत येत राहतो, ते एक वेगळं feeling होतं. या सगळ्या अडचणींच्यापुढे तो अनुभव खूपच वेगळा होता, ज्याची मी कधी कल्पनापण केली नव्हती.

**जपानमधील भटकंती**





**माऊंट फुजी येथील ज्वालामुखीचे विवर**












मनास्लू सर्किटचा ट्रेक



झिरो पॉईंटवर – ऑक्टो. २०२१

भारतात परत आल्यावर, एक दिवस आमच्या कंपनीमधील एका ग्रुप चे एव्हरेस्ट बेस कॅम्पचे अनुभवकथन मी ऐकले. ते सगळं पाहताना आणि ऐकताना मनात विचार आला – मी का नाही? आणि मी त्या गटामध्ये सामील झाले. हळूहळू सह्याद्रीमध्ये सरावासाठी अनेक ट्रेक करत-करत २०१५ साली Kashmir Great Lakes चा ट्रेक केला. मला थोडे offbeat treks करण्यात जास्ती रस आहे. २०१९ साली मनास्लू सर्किटचा ट्रेक केला. यासाठी अन्नपूर्णा पेक्षा उंच असलेल्या मनास्लू शिखराला प्रदक्षिणा घातली, आणि तीन बाजूंनी ते पर्वतशिखर पाहिलं. Johar Valley and Nanda Devi East Base Camp हे ट्रेक्स देखील यावर्षी केले. हे सगळे ट्रेक्स करताना सुरुवातीला जेवढं जमतंय, तेवढं करून बघू म्हणून सुरुवात केली. स्वतःला steadily push केलं. यामुळे क्षमता आणि सहजपणा दोन्ही वाढले. आत्मविश्वास देखील वाढला आणि आता सहज ट्रेक करता येतो. त्यामुळे, माझ्या अनुभवांवरून मला असं वाटतं, की वयाचा बाऊ न करता कुठल्याही स्वप्नासाठी एकदातरी प्रयत्न करून बघायला हरकत नाही. इच्छा, आवड आणि सातत्य असेल, तर तुम्ही कुठल्याही क्षेत्रात नक्की पुढे जाऊ शकता. Passion will lead you to happiness.

आवडीबरोबरच work-life balance माझ्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. प्राथमिक दृष्ट्या तुम्ही घर चालवण्यासाठी काम करता. त्यामुळे तुमचं वैयक्तिक आयुष्य देखील तुमच्या कामाइतकंच महत्त्वाचं आहे. जपानमध्ये असताना, आणि आत्ता भारतात देखील मी यावर भर देते, तासन्‌तास काम केल्याने उत्पादन क्षमतेमध्ये फार काही वाढ होते असं दिसत नाही. Well planned work yields better productivity. कोणाला काही अडचण असेल, तर त्यावर मार्ग काढून एकत्र काम करणे असा माझा दृष्टीकोन आहे.

प्रबोधिनी मधील शिक्षकांनी, पुढे इतर अनेकांनी मला जितकं शिकवलं तितकंच पुढे आयुष्याच्या विविध टप्प्यांवर मी हे शिकले, की अनुभव हा मोठा मार्गदर्शक/गुरू असतो. नलूताई, सुप्रियाताई, नीलिमाताई, पुष्पाताई, डॉ. संप्रसाद विनोद, ट्रेकमधील इतर सहकारी यांनी माझ्यावर जे संस्कार केले, त्याचप्रमाणे परिस्थितीने देखील मला खूप काही शिकवलं. प्रबोधिनीमध्ये जे विविध उपक्रम राबवत होती, त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सहभागातून बरंच काही शिकता आलं. त्यामुळे कुठल्याही गोष्टीचं तंत्र असतं, याची जाणीव झाली. The processes differ with context and goals, but they will be there. इथली शोधबोध प्रक्रिया हा Lessons Learnt सारख्या industrial practice चा एक उत्तम नमुना आहे. माझ्या आठवणीप्रमाणे पूर्वीपासून प्रबोधिनी आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि स्वतंत्र होण्यासाठी प्रबोध उद्योगांसारखे विविध उपक्रम राबवत होती. सध्याच्या तशा उपक्रमांबद्दल मला फारशी कल्पना नाही, परंतु industrial collaboration मधून तसे अजून उपक्रम करायला हवेत. अशा उपक्रमांबद्दल जाणून घ्यायला नक्की आवडेल.



## माझे छंद





## RAPID FIRE

१. आवडतं पुस्तक : एक होता कार्व्हर

२. आवडता चित्रपट : सांगता येणार नाही

३. प्रबोधिनीत लक्षात राहिलेला उपक्रम : Presentation Skills

४. पहिली प्रतिक्रिया:

- Engineering - My Nature and passion
- जपान/ जपानी भाषा/ Culture - My second home
- ज्ञान प्रबोधिनी - सामाजिक विचारांना दिशा देणारी संस्था
- ट्रेकिंग - Gateway to Nature

**अनुराधा दामले**
**8657470329**
**anugrps@yahoo.com**

**मुलाखत – चिन्मयी खरे शब्दांकन – अपूर्वा इनामदार संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org